Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 26/06/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष



## नारायण श्रीपाद राजहंस ऊर्फ बालगंधर्व

नारायण श्रीपाद राजहंस ऊर्फ बालगंधर्व हे २० व्या शतकातील मराठी रंगभूमीवरील अभिनेता, गायक आणि नाट्यनिर्माते होते. त्यांचा जन्म २६ जून १८८८ रोजी नागठाणे (सांगली) येथे झाला. रंगभूमीवर स्त्री-भूमिकांमुळे बालगंधर्वांनी मोठी लोकप्रियता मिळवली. नाट्यगीतांसह ख्याल, ठुमरी, गझल, दादरा, भक्तिगीते यांसारख्या गायन प्रकारांवरही त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते. बालगंधर्व हे भास्करबुवा बखले यांचे शिष्य आणि मास्तर कृष्णरावांचे गुरूबंधू होत. बाळ गंगाधर टिळकांनी त्यांना बालगंधर्व ही पदवी बहाल केली. पुढे ते त्याच नावाने लोकप्रिय झाले. त्यांनी आपली कारकीर्द किर्लोस्कर संगीत मंडळी या नाट्यसंस्थेत इ.स. १९०५ साली सुरू केली. तर प्रभात फिल्म कंपनीसाठी बालगंधर्वांनी 'धर्मात्मा' चित्रपटात संत एकनाथांची भूमिकाही केली.

नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर, गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, काकासाहेब खाडिलकर, राम गणेश गडकरी आणि वसंत शांताराम देसाई प्रभृतींनी लिहिलेली अनेक संगीत नाटके बालगंधर्वांनी केली. १९२९ सालच्या ४२ व्या मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. त्यांनी संगीत सौभद्र, संगीत मृच्छकटिक, संगीत शाकुंतल, संगीत मानापमान, संगीत संशयकल्लोळ, संगीत शारदा, संगीत मूकनायक, संगीत स्वयंवर (नाटक), संगीत विद्याहरण, संगीत एकच प्याला, संगीत कान्होपात्रासह एकूण २५ विविध नाटकांत भूमिका केल्या. त्यांची संगीत शाकुंतल नाटकातील 'शकुंतला' व मानापमान नाटकातील 'भामिनी' या भूमिकांमुळे एक प्रतिभावंत कलाकार म्हणून त्यांचे नाव सर्वत्र झाले. इ.स. १९५५ रोजी त्यांनी 'एकच प्याला' नाटकात साकार केलेली सिंधू ही त्यांची शेवटची भूमिका ठरली. बालगंधर्व यांचा १९५५ साली संगीत नाटक अकादमीने राष्ट्रपती पदक देऊन सन्मान केला. भारत सरकारने बालगंधर्वांना १९६४ साली पद्मभूषण या पुरस्काराने गौरविले. १५ जुलै १९६७ रोजी बालगंधर्व यांचे निधन झाले.

Nashik Edition
Jun 26, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

सकाळ

# शिक्षण घेतानाच २२८ विद्यार्थ्यांना नोकरी

## बाभूळगावच्या एसएनडी पॉलिटेक्निकमध्ये प्लेसमेंटमधून नामांकित कंपन्यांमध्ये निवड

**सकाळ वृत्तसेवा**

येवला, ता. ९ : शिक्षण घेताना शेवटच्या वर्षातच नोकरी लागली तर होणारा आनंद गगनापार असतो. बाभूळगाव येथील जगदंबा एज्युकेशन संस्थेच्या एसएनडी पॉलिटेक्निकमध्ये वर्षभरात तब्बल २२८ विद्यार्थ्यांना शिकत असतानाच नोकरीची संधी मिळाली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये एसएनडी पॉलिटेक्निक येथे आयोजित पूल कॅम्पसमध्ये या विद्यार्थ्यांची विवीध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. संस्थेने आणखी एक यशाचे शिखर गाठले आहे. विद्यार्थांना औद्योगिक क्षेत्राची माहिती व्हावी यासाठी तज्ज्ञांचे व्याख्यान व विविध कंपन्यांना भेटी देऊन तेथे होत असलेल्या कामाची रूपरेषा कशी असते याविषयी मार्गदर्शन आयोजित केले जाते. पुणे येथील टाटा मोटर्स मध्ये ५० विद्यार्थ्यांची निवड झाली. नाशिक येथील बॉश कंपनीमध्ये मेकॅनिकल अभियांत्रिकीचे १७ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकल अभियांत्रिकीचे १८, मुंबई येथील भारत गिअर कंपनीमध्ये मेकॅनिकलच्या ३५ विद्यार्थांची, अहिल्यानगर येथील माय इंडिया कंपनीत मेकॅनिकलचे १८ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकलचे २२ विद्यार्थ्यांची निवड झाली. संभाजीनगर येथील बजाज ऑटो कंपनीमध्ये मेकॅनिकलच्या २८ विद्यार्थी तर इलेक्ट्रिकलच्या २५ विध्यार्थांची निवड झाली. नाशिक येथील स्कायवे ग्रुपमध्ये सिव्हील इंजिनिअरिंगच्या १५ विद्यार्थ्यांची निवड झाली. विविध कंपन्यांमध्ये निवड झालेल्या विध्यार्थांना प्रतिवर्ष सरासरी ३-४ लाख रुपये पगार व कंपनीच्या विविध सुविधा मिळणार असल्याची माहिती प्राचार्य उत्तम जाधव यांनी दिली. संस्थेचे कार्यकारी संचालक रुपेश दराडे, प्राचार्य जाधव यांच्यासह विभागप्रमुख संदीप असुदे, गणेश चव्हाण, शोराब शेख, रविकुमार ताकसांडे, विजय गंडोळे, प्रवीण लहरे, संतोष माकुने आदींनी विध्यार्थांचे अभिनंदन केले.



**बाभूळगाव :** कॅम्पस प्लेसमेंटमधून नोकरीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांसोबत महाविद्यालयाचे प्राध्यापक.

> एसएनडी कॅम्पसमध्ये उपलब्ध अत्याधुनिक सुविधेमुळे तसेच विद्यार्थ्यांना शिकत असतानाच कॅम्पस मुलाखती व कंपन्यांसंदर्भात ज्ञान व माहिती देण्याचा प्रयत्न होतो. त्याचे फलित म्हणजे अधिकाधिक विद्यार्थ्यांना शिकत असतानाच नोकरी मिळत आहे याचा संस्थेला अभिमान वाटतो.
>
> **- रूपेश दराडे,** संचालक, मातोश्री शिक्षण संस्था, येवला.

Nashik, District-Today
10/06/2025 Page No. 3